| | |
|---|---|
| | नसावी या दोन्ही बाबतीत प्रतिज्ञापत्र दयावे.<br>४) विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.<br>५) विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत समाजकल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.<br>६) शिधापत्रिकेची छायांकित प्रत.<br>७) आधारकार्ड, पॅनकार्डची छायांकित प्रत. |

**९) दिव्यांग मुलांसाठी शाळा:-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग मुलांसाठी शाळा

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजना राबविणेसाठी आवश्यक अधिकारी तसेच कर्मचारी** सदर योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या दिव्यांग मुलांसाठी शाळा सुरु करावयाची असुन असुन सदर शाळेसाठी खालीलप्रमाणे अधिकारी तसेच कर्मचारी आवश्यक आहेत.

१) मुख्याध्यापक - ०१
२) मनोचिकित्सक - आवश्यकतेनुसार
३) शिक्षक - आवश्यकतेनुसार
४) लिपिक - आवश्यकतेनुसार
५) दिव्यांग मुलांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक – आवश्यकतेनुसार
६) शिपाई - आवश्यकतेनुसार

**१०) दिव्यांग व्यक्तींचे सर्व्हेक्षण करणे:-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या दिव्यांग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

दिव्यांग व्यक्तींची नोंदणी करण्यासाठी सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत.